सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २०४ | गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com






अमळनेर : अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीच्या जनजागराचा रथ बुधवार, दि. १५ एप्रिल रोजी सकाळी तालुक्यातील कन्हेरे येथे पोहोचल्यानंतर चिंचदेवी मंदिरातील सभा मंडपात कार्यक्रमाचे मुख्य अतिथी तथा लोकनियुक्त सरपंच चंद्रकांत अरुण नेरकर यांचा श्री मंगळग्रह देवाची प्रतिमा देऊन यथोचित सन्मान करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील. शेजारी कृषी विभागाचे अधिकारी. दुसऱ्या छायाचित्रात शेतकऱ्यांना भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीची माहिती देऊन मार्गदर्शन करताना कृषी विभागाचे अधिकारी. समोर उपस्थित शेतकरी बंधू-भगिनी.

## भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळ

माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः
भूमि सुपोषण एवं संरक्षण अभियान

श्री मंगलग्रह मंदिर अमळनेर

# कन्हेरेत भूमीमाता पूजनाने शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त जनजागर

## फापोरे बुद्रुक, हिंगोणे खुर्द, सडावण बुद्रुक, कोळपिंप्री येथेही रथ दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीच्या जनजागराचा रथ आज बुधवार, दि. १५ एप्रिल रोजी सकाळी ८.१५ वाजता तालुक्यातील कन्हेरे येथे पोहोचला. त्यानंतर चिंचदेवी मंदिरातील सभा मंडपात महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या बहुमोल सहकार्यातून कार्यक्रमाचे मुख्य अतिथी तथा लोकनियुक्त सरपंच चंद्रकांत अरुण नेरकर यांच्या शुभ हस्ते विधिवतरीत्या भूमीमातेचे पूजन तसेच सेंद्रिय शेतीबद्दलचा जागर करण्यात आला. याप्रसंगी कन्हेरे गाव व मंडळ परिसरातील शेतकऱ्यांनी आपापल्या गावांतील शेतांमधून आणलेल्या मातीचा भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरणात पूजनाचा कार्यक्रम झाला.

याप्रसंगी मंडळ कृषी अधिकारी प्रफुल्ल पाटील, सहाय्यक कृषी अधिकारी राजेश प्रकाश बोरसे, उप कृषी अधिकारी दिनेश पाटील, 'आत्मा'चे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक भूषण पाटील यांच्यासह मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील, अकाऊंट मॅनेजर मनोहर तायडे यांच्यासह श्री मंगळग्रह मंदिराचे पुरोहित प्रसाद भंडारी, गणेश जोशी तसेच सेवेकरी राजेंद्र पाटील, उज्ज्वल अहिरराव, दीपक पाटील, शुभम शिसोदे, अक्षय पाटील आदी उपस्थित होते.

सुरूवातीला व्यासपाठीवरील मुख्य अतिथी तथा लोकनियुक्त सरपंच चंद्रकांत नेरकर यांच्यासह सर्व मान्यवरांचा मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेरच्या वतीने सुबोध पाटील यांनी श्री मंगळग्रह देवाची प्रतिमा भेट देऊन यथोचित सन्मान केला. तसेच सुबोध पाटील यांनी भूमी सुपोषण चळवळीची पार्श्वभूमी सविस्तरपणे उपस्थितांना समजावून सांगितली. त्यानंतर मंदिराच्या पुरोहितांकडून मंडळातील विविध गावांतून संकलित केलेली एक मूठ माती एका ठिकाणी एकत्रित करून तिचे विधिवतरीत्या पूजन करण्यात आले.

कृषी विभागाचे प्रफुल्ल पाटील यांनी सेंद्रिय शेती तसेच त्यासाठी शासनातर्फे दिली जाणारी मदत, त्याचे महत्त्व शेतकऱ्यांना सविस्तरपणे सांगताना सद्यःस्थितीत देशातील शेती, शेतकरी, शेतमजूर व कृषी उत्पन्न आदींची स्थिती रासायनिक खते, कीटकनाशकांचा बेसुमार वापर यामुळे दयनीय झाली आहे. आपले पूर्वज पिढ्यानपिढ्या सेंद्रिय व सकस शेती करीत असल्याने आपल्या मुला-बाळांचे आरोग्य निरामय राहत होते, हे विसरून चालणार नाही, असे सांगितले.

भूषण पाटील यांनी निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, ट्रायकोडर्मा रायझोबियम, बीज प्रक्रिया याबद्दलची माहिती संक्षिप्तपणे शेतकऱ्यांना समजावून सांगितली. त्याचप्रमाणे शासनाच्या त्यांच्या मंडळांतर्गत त्यांच्या गावात सुरू असलेल्या जैविक शेतीबद्दलच्या विविध उपक्रमांची माहितीही शेतकऱ्यांना दिली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीचे महत्त्व सांगणाऱ्या पॉम्प्लेटचेही वितरीत करण्यात आले. तसेच भूमी सुपोषण राष्ट्रीय चळवळीच्या जनजागर अभियानाची अधिकाधिक शेतकऱ्यांना माहिती देण्याचे आवाहनही केले.





भूमीमातेचे विधिवत पूजन करताना चंद्रकांत नेरकर, मंगळग्रह सेवा संस्थेचे सुबोध पाटील, पुरोहित प्रसाद भंडारी व गणेश जोशी. समोर उपस्थित शेतकरी बंधू-भगिनी. शेजारी कन्हेरे मंडळातील फापोरे बुद्रुक, हिंगोणे खुर्द, सडावण बुद्रुक, कोळपिंप्री येथेही जनजागर करणारा रथ.

### या गावांनाही दिली जनजागर रथाने भेट

भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीच्या जनजागर रथाने कृषी विभागाच्या बहुमोल सहकार्याने अमळनेर तालुक्यातील कन्हेरे या गावासह मंडळातील फापोरे बुद्रुक, हिंगोणे खुर्द, सडावण बुद्रुक, कोळपिंप्री येथेही आज बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ रोजी भेट दिली. याप्रसंगी तेथील ग्रामस्थांना एकत्र बोलावून भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळीचे महत्त्व सांगणाऱ्या पॉम्प्लेटचेही वितरीत करण्यात आले. तसेच ध्वनिक्षेपकावरून या अभियानाचे महत्त्व, कार्याची सविस्तर माहिती तसेच अन्नदात्या भूमीमातेचे महत्त्व पटवत जैविक शेतीला प्रोत्साहन देणे कसे महत्त्वपूर्ण आहे, हे शेतकरी बांधवांना समजावले. तसेच त्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे निराकरणही करण्यात आले.

### आजचे अभीष्टचिंतन



श्री. विजय साळुंखे
पोलीस



श्री. नितीन बोरसे
अमळनेर



श्री. गिरीश पाटील
अमळनेर

### दिनविशेष
१६ एप्रिल

- बोरीबंदर ते ठाणे अशी पहिली प्रवासी रेल्वे सेवा भारतात सुरू झाली.
- मुळशी सत्याग्रह सुरू झाला.
- राष्ट्रीय छात्र संघाची (NCC) स्थापना झाली.
- निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांना ऑनेस्ट मॅन ऑफ इयर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**डासांमुळे संपूर्ण गाव त्रस्त**
पान २ वर



अमळनेर : युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे युवांसाठी नुकत्याच घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांसमवेत युवा कल्याण प्रतिष्ठानचे विविध पदाधिकारी.

# युवांसाठीच्या वक्तृत्व स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे महापुरुषांच्या विचारांचा जागर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे यांच्या वतीने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेचे विषय 'महात्मा जोतिराव फुले : जीवन व कार्य' आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य' असे होते. महापुरुषांच्या विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा आणि युवा वक्ते घडावेत, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक-१०००/- रुपये, द्वितीय- ७५०/- रुपये व तृतीय- ५००/- रुपये ठेवण्यात आले होते. याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. लीलाधर पाटील, प्रा. डॉ. राहुल निकम व अशोक बिऱ्हाडे यांनी काम पाहिले. स्पर्धेत प्रथम क्रमांक- अखिलेश मनोज पाटील, द्वितीय- सायली योगराज पाटील तर तृतीय क्रमांक पल्लवी रामकृष्ण पाटील यांनी पटकावला. स्पर्धेच्या पारितोषिकांचे प्रायोजकत्व अनुक्रमे श्याम जयंतराव पाटील, वंदना ठेंग व चिंधू वानखेडे यांनी स्वीकारले होते. विजेत्या स्पर्धकांना गोकुळ पाटील (माजी केंद्रप्रमुख), हरिश्चंद्र कढरे, प्रा. अशोक पवार, दयाराम पाटील व बापूराव ठाकरे यांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वितेसाठी हृदयनाथ मोरे, मिलिंद निकम, संजय पाटील आदींनी विशेष परिश्रम घेतले. विठ्ठलनगरातील अभ्यासिकेत हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

**उन्हाचा कडाका**


# फलाट क्र. २ वरील पंखे बंदच!

## अमळनेर रेल्वेस्थानकावर प्रवासी त्रस्त; रेल्वे प्रशासन मात्र सुस्त...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संपूर्ण राज्यात सद्यःस्थितीत कमाल तापमानात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे मुंबईसह राज्यातील विविध जिल्ह्यांत उष्ण आणि दमट वातावरण आहे. मात्र, अशी स्थिती असतानाही येथील रेल्वेस्थानकावरील फलाट क्र. २ वरील पंखे बंदावस्थेतच आहेत. त्यामुळे प्रवाशी त्रस्त असून, त्यांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. परंतु अशा स्थितीतही रेल्वे प्रशासन सुस्तच असल्याची स्थिती आहे.

येथील स्थानकात रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सोयीसाठी सर्वच फलाटांवर पंखे लावलेले आहेत. मात्र फलाट क्र. २ वरील पंखे बंदच आहेत. त्यामुळे प्रवाशांवर उकाड्याला सामोरे जाण्याची वेळ आलेली आहे. यात विशेषतः आजारी रुग्ण, वृद्ध व लहान मुलांची मोठी गैरसोय होत असल्याचे दिसून येत आहे.




अमळनेर : येथील रेल्वे स्थानकातील फलाट क्र. २ वर बुधवार, दि. १५ एप्रिल रोजी पंखे बंद असल्याने उकाड्याचा त्रास सहन करीत बसलेले प्रवासी.

याबाबत काही प्रवाशांची भेट घेतली असता त्यांनी संताप व्यक्त करत सांगितले, की रेल्वे प्रशासनाने तत्काळ लक्ष देऊन पंखे सुरू सुरू करायला हवेत अन्यथा उकाड्यामुळे प्रकृतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. रेल्वेस्थानकातील फलाट क्र. २ वरील ही समस्या वारंवार गेल्या काही दिवसांपासून जैसे थे आहे. मात्र रेल्वे प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

दरम्यान, रेल्वे प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष पुरवून स्थानकावरील सर्व पंखे पूर्ववत सुरू करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## संपादकीय

### शाश्वत ऊर्जास्रोतांच्या वापराकडे...


देशाच्या एकूण ऊर्जानिर्मितीत अणुऊर्जेचा वाटा तुलनेने खूपच कमी असून तो वाढविण्याला पर्याय नाही. मात्र, त्यासाठी आवश्यक युरेनियमची उपलब्धता देशात अल्प आहे. सरत्या आठवड्यात भारताने देशाच्या अणुऊर्जा प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा गाठला. असे यश मिळविणारा रशियानंतरचा तो दुसरा देश बनला. हा टप्पा आहे, अणुभट्टीतील अणुभंजनाची साखळी स्वत:हून टिकवून ठेवण्याचा; यामुळे अणुभट्टी स्वत: ऊर्जानिर्मिती करू लागते. अणुविज्ञानाच्या भाषेत याला क्रिटिकॅलिटी गाठणे म्हणतात. तमिळनाडूतील कल्पक्कम येथील प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टरने हा स्वयं ऊर्जानिर्मितीचा टप्पा गाठण्याला ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. आपल्याकडे थोरियमचा साठा मोठ्या प्रमाणावर असला, तरी त्यापासून अणुविखंडनाची प्रक्रिया होत नसल्याने त्याद्वारे ऊर्जा निर्माण होऊ शकत नाही. थोरियमचा साठा वापरायचा असेल, तर त्याचे ‘युरेनियम २३३’मध्ये रूपांतर करणे गरजेचे असते. भारतीय अणुऊर्जा क्षेत्राचे जनक असलेले होमी भाभा यांनी, म्हणूनच देशातील ऊर्जा कार्यक्रमाची तीन टप्प्यांत आखणी केली होती. त्यातील पहिल्या टप्प्यात नैसर्गिक युरेनियमचा वापर करणारी अणुभट्टी अन् दुसऱ्या टप्प्यात प्लुटोनियम-युरेनियम मिश्र अणुभट्टी. हे दोन्ही टप्पे थोरियमसाठी आवश्यक इंधन पुरवणारे असल्याने तिसऱ्या टप्प्यात थोरियमच्या साठ्याचा अधिकाधिक उपयोग करणे शक्य होते. कल्पक्कम येथील द्रुतगती अणुभट्टीने क्रिटिकॅलिटी गाठून थोरियमच्या वापराच्या म्हणजेच शाश्वत अणुऊर्जेच्या दिशेने पाऊल टाकले आहे. देशात थोरियमचा उपलब्ध साठा लक्षात घेता ही अतिशयोक्ती म्हणता येणार नाही. म्हणूनच भारताच्या या यशाला मोठे महत्त्व दिले जात आहे.

कल्पक्कम येथील अणुभट्टीने क्रिटिकॅलिटी गाठण्याची प्रक्रिया आव्हानांनी भरलेली होती. अणुभट्टीत अणूंचे विखंडन होऊन एक साखळी प्रक्रिया होत असते, तिला ‘फिशन’ असे म्हणतात. या विखंडनातून निर्माण होणारे न्यूट्रॉन पुढील अणूंना तोडतात आणि प्रक्रिया सुरू राहते. दोनाचे चार, चाराचे आठ अशा प्रकारे ही साखळी प्रक्रिया होत असते. विखंडनातून निर्माण होणारे न्यूट्रॉन हे पुढील अणूंना तोडण्याइतपतच असावे लागतात. कमी किंवा अधिक असून चालत नाही. हा समतोल राखणे हे एक प्रमुख आव्हान असते. द्रुतगती अणुभट्टी न्यूट्रॉनवर कार्यान्वित असल्याने आणि तिच्या अणुगाभ्यातून प्रचंड ऊर्जा निघत असल्याने ती थंड करण्यासाठी द्रव सोडियमचा योग्य प्रमाणात मारा करावा लागतो. ही देखील एक आव्हानात्मक बाब होती. याशिवाय सुरक्षिततेचा मुद्दाही आव्हानात्मक असतो. अशा सर्व आव्हानांवर मात करून द्रुतगती अणुभट्टीने क्रिटिकॅलिटी गाठली असून, ती आता स्वयंऊर्जा निर्मितीच्या अवस्थेत पोहोचली आहे. यामुळे थोरियमचा वापर करता येईल आणि अणुऊर्जेचे प्रमाण वाढविता येईल. भारतात सध्या सुमारे सात गिगावॉट ऊर्जा ही अणुद्वारे निर्माण केली जाते. देशातील थोरियमचा साठा पाहता पुढील तब्बल चारशे वर्षांपर्यंत दर वर्षी पाचशे गिगावॉट ऊर्जानिर्मिती करता येऊ शकेल. ही क्षमता सध्या निर्माण झाली नसली, तरी कल्पक्कम अणुभट्टीतील सध्याच्या यशाने त्या दिशेने प्रवास सुरू झाला, असे म्हणता येऊ शकते. अणुऊर्जा विभागाने चार अतिरिक्त द्रुतगती अणुभट्ट्या उभारण्यास मान्यता दिली आहे. पाचशे मेगावॉट क्षमतेच्या दोन भट्ट्या या कल्पक्कम येथेच उभारल्या जातील. थोरियमचा वापर करणाऱ्या अशा आणखी काही अणुभट्ट्या उभारत गेल्यास देशातील एकूण ऊर्जानिर्मितीतील अणुऊर्जेचा वापर टप्प्याटप्प्याने वाढत जाईल.

ऊर्जेच्या बाबतीत देशासमोरील आव्हान दुहेरी आहे. एकीकडे भौतिक विकास गतिमान करण्यासाठी ऊर्जानिर्मिती वाढवावी लागणार आहे, तर दुसरीकडे यामुळे होणारे प्रदूषण म्हणजेच कार्बन उत्सर्जन कमी करावे लागणार आहे. त्यासाठी स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जास्रोतांचा वापर वाढवावा लागेल. सध्या देशाची ऊर्जानिर्मितीची क्षमता ५२० गिगावॉट असून, त्यांपैकी ४७ टक्के ऊर्जा ही प्रदूषणकारी जीवाश्म इंधनाच्या म्हणजे कोळसा आदी स्रोतांद्वारे निर्माण केली जाते. अन्य स्रोतांद्वारे, तसेच सौर, पवन आदी अपारंपरिक स्रोतांद्वारे निर्माण होणाऱ्या ऊर्जेचे प्रमाण आता ५२ टक्क्यांवर पोहोचले असले, तरी भविष्यातील गरज लक्षात घेता हे प्रमाण वाढवावे लागणार आहे. वैश्विक तापमानवाढ रोखण्यासाठी कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करण्यासाठी भारतानेही कटिबद्धता व्यक्त केली आहे. त्याची पूर्तता होण्यासाठीही स्वच्छ ऊर्जास्रोतांची गरज आहे. येथे अणुऊर्जेचे महत्त्व अधोरेखित होते. अणुकचऱ्याचा मुद्दा असला, तरी या स्रोताच्या वापराने कोणतेही प्रदूषण होत नाही. शिवाय भारताची भविष्यातील ऊर्जेची गरज भागविण्याची क्षमताही अणुस्रोतात आहे. थोरियमच्या वापरासाठी कल्पक्कम अणुभट्टीने गाठलेला टप्पा यामुळे महत्त्वाचा ठरतो; देशाच्या अक्षय अणुऊर्जेचा मार्ग तेथूनच जातो.

# डासांमुळे संपूर्ण गाव त्रस्त

## लग्नासाठी गावात मुलगी द्यायला नाही कुणी तयार



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुजरातमधील राजकोटजवळच्या वेजागावची ही कहाणी आहे. डासांमुळे एखादे गाव कसे जेरीस येते आणि तेथे कशी गंभीर परिस्थिती निर्माण होते, याचे उदाहरण म्हणजे हे वेजागाव. वेजागावाला सध्या जी समस्या भेडसावते आहे, ती काहीशी विचित्र वाटू शकेल. मात्र ती तितकीच गंभीर आहे. या गावात डासांपासून असणारा धोका इतका वाढला आहे की गावकरी हे कायम मच्छरदाणी खाली राहत आहेत.

इतकेच नाही तर गावातील गुरंढोरांनादेखील मच्छरदाणीत ठेवावे लागत आहे. डासांच्या समस्येमुळे इथे तरुणांच्या लग्नामध्येही अडचणी येत आहेत.

**‘कोणीही लग्नासाठी मुलगी देत नाही’**

कांजीभाई हिराभाई हे वेजागावचे रहिवासी आहेत. ते म्हणतात, की ‘आमच्या गावात लग्नासाठी मुलगी द्यायला कोणीही तयार नाही. आमच्या गावात कोणतेही पाहुणे रात्रीच्या वेळेस मुक्काम करत नाहीत. जरी पाहुणे-नातेवाईक आले, तरी ते फक्त दिवसभर थांबतात आणि संध्याकाळी 5 वाजेच्या आधी गावातून निघून जातात.’ कांजीभाई हिराभाई पुढे म्हणाले, की ‘आम्ही आता याला कंटाळलो आहोत. या संकटातून कृपया आमची सुटका करा. या डासांच्या समस्येला आम्ही खूपच वैतागलो आहोत.’ कुंवरबेन वेजागावातील शेतकरी असून त्यांचा दुग्ध व्यवसाय आहे. त्यांच्याकडे गुरंढोरे आहेत. त्या म्हणतात, की ‘आमच्या गावात मच्छरदाणी असणं ही अत्यावश्यक बाब आहे. त्याशिवाय आम्ही राहूच शकत नाही. मच्छरदाणी नसेल तर रात्रभर डास चावत राहतात, हैराण करून सोडतात.’ ‘डासांच्या उपद्रवामुळे आम्हाला मच्छरदाण्या सतत लावून ठेवाव्या लागतात. आम्हाला डासांचा प्रचंड त्रास आहे. गेल्या ७-८ वर्षांपासून या परिस्थितीत मी राहते आहे.’

विक्रम दाभी हे वेजागावचे आणखी एक दुग्धव्यवसाय करणारे रहिवासी आहेत. ते म्हणाले, की ‘ येथे गावात सर्वत्र डास आहेत. संध्याकाळ होताच, डासांच्या झुंडी येथे फिरू लागतात. ही एक खूप मोठी समस्या आणि उपद्रव आहे.’

### नातेवाईकदेखील रात्री मुक्काम करत नाहीत

अगदी या गावात जर कोणाकडे पाहुणे-नातेवाईक आले, तरी ते येथे मुक्कामी राहत नाहीत. डासांच्या त्रासामुळे संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ही पाहुणे मंडळी गावातून निघून जातात. डासांमुळे दुभत्या जनावरांवर देखील परिणाम झाला असून दुधाचे उत्पादन घटले आहे. कांजीभाई हिराभाई सांगतात, की ‘गावातील लोकांना कोणताही व्यवसाय उपलब्ध नाही. येथे पाण्याचीही मोठी समस्या आहे. येथे डासांचा प्रचंड त्रास आहे. अशा परिस्थितीत आम्ही काय करायचे? आमची मुले डासांमुळे सतत आजारी पडत असतात. आम्ही जे काही उत्पन्न मिळवतो, त्यातील बहुतांश भाग औषधोपचारांमध्येच खर्च होतो. आम्हाला सतत औषधे विकत घ्यावी लागतात.’

### बोगस शालार्थ आयडी घोटाळा

# जळगावातील तब्बल ४८ आजी-माजी शिक्षणाधिकाऱ्यांची चौकशी सुरू!

## नाशिक विभागीय शिक्षण मंडळ कार्यालयात उपस्थित राहून बाजू मांडावी लागणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिक्षण विभागाला हादरवून सोडणाऱ्या बोगस शालार्थ आयडी घोटाळ्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून, विशेष तपास पथकाने (एसआयटी) या प्रकरणात मोठी कारवाई सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातील विद्यमान माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण तसेच तत्कालीन ११ शिक्षणाधिकाऱ्यांसह एकूण ४८ अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

### यांना बजावल्या नोटिसा

या प्रकरणात जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा सहभाग लक्षणीय असल्याचे तपासात उघड झाले आहे. नोटीस बजावलेल्या ४८ जणांमध्ये कल्पना चव्हाण, आर. डी. विसपुते, एस. बी. हिंगोणेकर, एस. टी. वराडे, डी. पी. महाजन, बी. जे. पाटील, बी. एस. अकलाडे, डॉ. नितीन बच्छाव, सचिन परदेशी, डॉ. किरण कुंवर, डॉ. एम. व्ही. कदम यांच्यासह ११ उपशिक्षणाधिकारी, तीन कक्षाधिकारी तसेच वरिष्ठ आणि कनिष्ठ सहायकांचा समावेश आहे. या सर्वांकडून कागदपत्रांची पडताळणी, निर्णय प्रक्रियेत सहभाग आणि आर्थिक व्यवहारांबाबत सविस्तर चौकशी केली जाणार आहे. सर्वांना १५ ते १८ एप्रिलदरम्यान नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आपली बाजू मांडावी लागणार आहे.

घोटाळ्याचा उलगडा झाल्यानंतर समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार बनावट कागदपत्रांच्या आधारे राज्यभरात ६०० हून अधिक शिक्षकांचे बोगस शालार्थ आयडी तयार करण्यात आले होते. या आयडींच्या माध्यमातून शासकीय यंत्रणेला फसवून कोट्यवधी रुपयांचा पगार काढण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. शालार्थ प्रणाली ही शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वापरली जाणारी महत्त्वाची शासकीय डिजिटल यंत्रणा असून, त्यात अशा प्रकारची मोठ्या प्रमाणात छेडछाड झाल्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एसआयटीच्या तपासात २०१३ ते २०२६ या तब्बल १३ वर्षांच्या कालावधीत नाशिक विभागातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या सुमारे ८९२ कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीमध्ये गंभीर अनियमितता आढळून आल्या आहेत.

**यापूर्वी १० मुख्याध्यापकांची चौकशी**

ऑक्टोबर २०२५ मध्ये नाशिक येथील आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणाचा प्राथमिक तपास सुरू केला होता. सुरूवातीला काही संशयास्पद व्यवहारांच्या आधारे तपास सुरू झाला असला, तरी पुढे त्याचा विस्तार होत गेला आणि संपूर्ण यंत्रणेतील मोठ्या गैरव्यवहाराचा उलगडा झाला. तपासाची व्याप्ती वाढत गेल्याने राज्य शासनाने एसआयटीची नियुक्ती केली आणि तपासासाठी अतिरिक्त तीन महिन्यांची मुदतवाढही दिली.

सध्या एसआयटीकडून आर्थिक व्यवहारांची साखळी, संबंधित बँक खात्यांची माहिती, तसेच आयडी तयार करण्याच्या प्रक्रियेत वापरण्यात आलेली डिजिटल प्रणाली यांची बारकाईने छाननी केली जात आहे. यापूर्वी जळगाव जिल्ह्यातील १० शाळांमधील मुख्याध्यापकांची चौकशी करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातील कागदपत्रे, नियुक्ती आदेश, हजेरी नोंदी आणि वेतनविषयक माहिती जप्त करण्यात आली आहे. या कागदपत्रांच्या आधारे अनेक महत्त्वाचे धागेदोरे मिळाले आहेत.

**फौजदारी कारवाईची शक्यता**

दरम्यान, नाशिकमध्ये होणाऱ्या सुनावणीसाठी संबंधित सर्व अधिकारी रवाना झाले आहेत. या चार दिवसांत प्रत्येक अधिकाऱ्याची स्वतंत्रपणे चौकशी करून त्यांचे जबाब नोंदविले जाणार आहेत. आवश्यकतेनुसार काहींवर पुढील फौजदारी कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सुनावणीनंतर या घोटाळ्याचे नेमके सूत्रधार कोण, आर्थिक लाभ कोणी घेतला आणि यामागील संपूर्ण जाळे किती मोठे आहे, याचा अधिक स्पष्ट उलगडा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिक्षण विभागातील अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. सध्या संपूर्ण राज्याचे लक्ष या प्रकरणाकडे लागले असून, पुढील काही दिवसांत होणाऱ्या कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ‘उधना-संतरागाछी’

# विशेष रेल्वे गाडी धावणार

## खानदेशातील प्रवाशांना मिळणार मोठा दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : उन्हाळी हंगामात वाढलेल्या प्रवाशांच्या गर्दीचा विचार करून पश्चिम रेल्वेकडून उधना-संतरागाछी दरम्यान विशेष रेल्वे गाडी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः भुसावळ आणि नंदुरबार परिसरातील प्रवाशांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. मर्यादित कालावधीसाठी चालविण्यात येणाऱ्या या विशेष गाडीचे वेळापत्रक आणि थांबे जाहीर करण्यात आले आहेत.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार गाडी क्रमांक ०९०७३ उधना-संतरागाछी विशेष गाडी १७ ते २४ एप्रिल या कालावधीत धावणार आहे. प्रत्येक शुक्रवारी आणि बुधवारी सकाळी ११:२५ वाजता उधना येथून सुटल्यानंतर प्रवासादरम्यान विविध महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा घेत ही गाडी दुसऱ्या दिवशी रात्री ९:०० वाजता संतरागाछी येथे पोहचणार आहे. परतीच्या दिशेने गाडी क्रमांक ०९०७४ संतरागाछी-उधना विशेष गाडी १९ ते २६ एप्रिल २०२६ या कालावधीत धावणार आहे. ही गाडी प्रत्येक रविवारी आणि शुक्रवारी पहाटे ०:०५ वाजता संतरागाछी येथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी १०:०० वाजता उधना येथे पोहोचेल. दोन्ही दिशांनी संतुलित वेळापत्रक ठेवण्यात आले असून, प्रवाशांना प्रवास नियोजन करणे सुलभ होणार आहे.

दोन्ही विशेष गाड्यांचे थांबे महत्त्वाच्या स्थानकांवर देण्यात आले आहेत. ज्यामध्ये नंदुरबार, भुसावळ, बडनेरा, नागपूर, गोंदिया, दुर्ग, रायपूर, बिलासपूर, झारसुगुडा, राउरकेला, चक्रधरपूर, टाटानगर आणि खरगपूर या प्रमुख स्थानकांचा समावेश आहे. त्यामुळे महाराष्ट्र, विदर्भ, छत्तीसगड आणि ओडिशा या राज्यांदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना थेट जोडणी मिळणार आहे. या मार्गावरील औद्योगिक तसेच शैक्षणिक प्रवासासाठीही ही सेवा उपयुक्त ठरणार आहे. गाडीत प्रवाशांच्या सोयीसाठी शयनयान आणि सामान्य (जनरल) अशा विविध श्रेणींचे डबे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे विविध आर्थिक स्तरातील प्रवाशांना प्रवासाची संधी मिळणार आहे. तसेच लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न रेल्वेकडून करण्यात आला आहे.

# सोने, चांदीच्या दरात सलग दुसऱ्या दिवशी तेजी

## जळगावातील सुवर्ण बाजारपेठेत मोठी उलथापालथ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सुवर्ण बाजारपेठेत मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सोने, चांदीच्या दरात मोठी वाढ नोंदविली गेली होती. त्यानंतर सलग दुसऱ्या दिवशी बुधवार, दि. १५ एप्रिल रोजी सकाळी बाजारपेठ सुरू होताच पुन्हा दोन्ही धातूंचे दर वधारल्याने ग्राहकांमध्ये खळबळ उडाली. उलाढाल मंदावण्याच्या भीतीने सुवर्ण व्यावसायिकांनाही घाम फुटला.

विशेषतः इराण आणि अमेरिका यांच्यातील संभाव्य चर्चेच्या दुसऱ्या फेरीच्या अपेक्षेमुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षित गुंतवणुकीचे साधन मानल्या जाणाऱ्या सोने आणि चांदीच्या दरातही वाढ नोंदविली जात आहे. एका दिवसाच्या घसरणीनंतर सोन्याचे दर सलग दुसऱ्या दिवशी वधारले असून, बाजारात सकारात्मक कल




दिसून येत आहे. त्याचवेळी चांदीच्या दरातही लक्षणीय वाढ झाली आहे. दोन्ही मौल्यवान धातूंमध्ये वाढ होत असल्याने गुंतवणूकदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

तज्ज्ञांच्या मते- दोन्ही धातूंच्या दरातील सध्याची तेजी ही मुख्यतः आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडींवर आधारित आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव तसेच संभाव्य चर्चेतील अनिश्चितता यामुळे बाजारात अस्थिरता निर्माण होत आहे. यापूर्वी झालेल्या चर्चेच्या अपयशामुळे गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण होते. परंतु नव्या चर्चेच्या शक्यतेमुळे बाजारात पुन्हा सकारात्मकता परतली आहे.

# बापरे! या अभिनेत्रीने १० कोटींमध्ये बांधलेले घर १०० कोटींना विकले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूड इंडस्ट्रीमधील या अभिनेत्री १० कोटींमध्ये तयार केलेले घर तब्बल १०० कोटी रुपयांमध्ये विकले आहे. यातून तिने ९० कोटींचा नफा कमावला आहे. दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री ‘मीना’ सध्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. ‘दृश्यम’ या गाजलेल्या चित्रपटातून घराघरांत पोहोचलेल्या मीनाच्या चेन्नईतील आलिशान घराची तब्बल १०० कोटी रुपयांना विक्री झाल्याची चर्चा रंगली आहे.

माहितीनुसार मीनाने काही वर्षांपूर्वी चेन्नईत हे घर सुमारे १० कोटी रुपये खर्चून बांधले होते. आता हेच घर १०० कोटी रुपयांना विकले गेल्याची चर्चा आहे. जर ही माहिती खरी ठरली तर या व्यवहारातून मीनाला जवळपास ९० कोटी रुपयांचा मोठा नफा झाल्याचे मानले जात आहे.


हे आलिशान घर चेन्नईमधील एका प्रतिष्ठित भागात असून त्याचे इंटेरिअर अत्यंत आकर्षक आणि पारंपरिक शैलीत सजवलेले आहे. घराच्या डिझाइनमध्ये मीनाच्या आईचा मोठा वाटा असल्याचे सांगितले जाते. या घराची खरेदी अमेरिकेतील एका एनआरआय जोडप्याने केल्याची चर्चा आहे.

# अभिनय सोडून शेतीत गेले, डोक्यावर २ कोटींचे कर्ज

## मुलांची फी भरण्यासाठी विकली भाजी; लोकप्रिय अभिनेत्याने ‘असे’ फेडले कर्ज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

साराभाई विरूद्ध साराभाई या मालिकेतून घराघरात पोहोचलेले अभिनेते राजेश कुमार सध्या चर्चेत आहेत. काही वर्षांपूर्वी अभिनयातून ब्रेक घेत त्यांनी पूर्णवेळ ऑरगॅनिक शेती करायचे ठरवले. सुरूवातीला योग्य वाटलेला हा निर्णय निसर्ग, बाजारभाव आणि लॉकडाऊनचा फटका अशा लागोपाठ आलेल्या संकटामुळे वाटतो तितका सोपा नाही याची जाणीव झाली. पण तोपर्यंत शेतीच्या या ध्यासामुळे अभिनेत्यावर दोन कोटी रुपये कर्ज झाले. बहिणींच्या पाठिंब्यामुळे पुन्हा अभिनयाकडे अभिनेता वळला. अन् ८० टक्के कर्ज त्यांनी फेडले आहे. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अभिनेते राजेश कुमार यांनी त्यांच्या आयुष्यातील संघर्षाचा काळ सांगितला आहे. आपण अनेकदा भाऊबंदकी, भावकीचा वाद, बहिण भावांमध्ये प्रॉपर्टीवरून झालेली भांडण ऐकतो. पण साराभाई विरुद्ध साराभाई फेम अभिनेते राजेश कुमार यांनी केवळ बहिणींच्या पाठिंबामुळे दोन कोटी रुपयांचे कर्ज फेडत आणले आहे. अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत त्यांनी अडचणीत असताना पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिलेल्या बहिणींविषयी सांगितला आहे.



**दोन कोटींचे कर्ज डोक्यावर, मुलांच्या शाळेबाहेर भाजी विकण्याची वेळ**

आयुष्यातील एका खडतर काळाविषयीही त्यांनी मनमोकळेपणाने बातचीत केली. मनोरंजनसृष्टीतून ब्रेक घेऊन कायमस्वरूपी शेती करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पूर, बदललेले हवामान आणि कोविड महामारीचा काळ असे तिहेरी संकट आल्याने अभिनेते राजेश कुमार यांचे शेतीत मोठ नुकसान झाले. इतके की त्यांची जवळपास १५ हजार रोपे नष्ट झाली. शेतीत दोन कोटी रुपयांचे कर्ज डोक्यावर होते. आता हे कर्ज फेडायचे कसे? असा प्रश्न पडला. एक काळ असा आला की अभिनेते राजेश कुमार यांच्याकडे मुलांच्या शाळेची फी भरायलाही पैसे उरले नाहीत. मुलांच्या शाळेबाहेर त्यांना भाजी विकण्याची वेळ आली. त्यावेळी त्यांच्या खात्यात केवळ अडीच हजार रुपये उरले होते. असे राजेश यांनी सांगितलं.

**दोन्ही बहिणींनी लाखो रुपयांच्या नोकऱ्या सोडल्या**

राजेश यांच्या दोन्ही बहिणी गेल्या २५ वर्षांपासून परदेशात स्थायिक होत्या. एक बहीण अमेरिकेत तर दुसरी फिनलंडमध्ये महत्त्वाच्या पदांवर होत्या. पण, आपला भाऊ कर्जात बुडाल्याचे समजताच, दोन्ही बहिणींनी त्यांच्या लाखो रुपयांच्या नोकऱ्या सोडल्या आणि त्या थेट बिहारमधील आपले गाव गाठले. राजेश यांच्या ५० व्या वाढदिवस त्यांच्या मोठ्या बहिणीने शेतीची सगळी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली आणि राजेश यांना पुन्हा अभिनयाकडे वळण्याचा सल्ला दिला. जेणेकरून राजेश यांना कर्ज फेडता येईल.


**अभिनेत्याने ८० टक्के कर्ज फेडले**

बहिणींनी शेतीची जबाबदारी सांभाळल्यामुळे अभिनेते राजेश कुमार पुन्हा एकदा अभिनयाकडे वळले. ‘कोटा फॅक्टरी’, ‘सैयारा’ सारख्या प्रोजेक्ट्समधील मिळालेल्या यशानंतर अभिनेते राजेश कुमार यांनी दोन कोटी रुपयांपैकी जवळपास ८० टक्के कर्ज फेडले आहे. आता त्याच्यावर केवळ २० टक्के कर्ज शिल्लक असून, लवकरच ते पूर्णपणे कर्जमुक्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# भारतीय चित्रकलेचे महान शिल्पकार



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

स्मृतिदिन विशेष

भारतीय आधुनिक चित्रकलेच्या इतिहासात ज्यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून राष्ट्रीयतेचा आत्मा जागवला, असे महान चित्रकार नंदलाल बोस यांचा १६ एप्रिल रोजी स्मृतिदिन. १६ एप्रिल १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या कलेने भारतीय संस्कृती, परंपरा आणि स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा यांना एक वेगळी दिशा दिली.

**प्रारंभिक जीवन**

नंदलाल बोस यांचा जन्म ३ डिसेंबर १८८२ रोजी बिहारमधील मंगळकोट येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना चित्रकलेची आवड होती. पुढे त्यांनी कोलकात्यातील गव्हर्नमेंट स्कूल ऑफ आर्ट येथे शिक्षण घेतले. तेथे त्यांना अबनींद्रनाथ टागोर यांसारख्या गुरूंचे मार्गदर्शन लाभले. ज्यामुळे त्यांच्या कलेला नवी दिशा मिळाली.

**शांतिनिकेतन आणि कलात्मक योगदान**

नंदलाल बोस यांनी शांतिनिकेतन येथे कार्य करताना भारतीय कलेचा नवा अध्याय लिहिला. तेथे त्यांनी विद्यार्थ्यांना भारतीय परंपरेशी जोडलेली कला शिकवली. त्यांच्या चित्रांमध्ये भारतीय लोकजीवन, निसर्ग, पुराणकथा आणि स्वातंत्र्यलढ्याचे प्रतिबिंब दिसते.

**स्वातंत्र्यलढ्यातील योगदान**

नंदलाल बोस यांनी महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित होऊन स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. १९३८ च्या हरिपुरा काँग्रेस अधिवेशनासाठी त्यांनी तयार केलेली पोस्टर्स आणि सजावट आजही ऐतिहासिक मानली जाते. त्यांच्या कलेतून देशभक्तीचा आणि स्वावलंबनाचा संदेश दिला गेला.

**वैशिष्ट्यपूर्ण शैली**

त्यांच्या कलेची शैली अत्यंत साधी, पण प्रभावी होती. त्यांनी भारतीय पारंपरिक शैलीला आधुनिकतेची जोड दिली. रंगसंगती, रेखाटन आणि विषयांची निवड यामध्ये भारतीयत्वाचा ठसा स्पष्टपणे दिसतो. त्यांनी लोककलेला उच्च स्थान मिळवून दिले.

**सन्मान आणि गौरव**

नंदलाल बोस यांना त्यांच्या कार्यासाठी अनेक सन्मान प्राप्त झाले. भारत सरकारने त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने गौरविले. त्यांच्या कलेचा प्रभाव आजही अनेक कलाकारांवर दिसून येतो. नंदलाल बोस हे केवळ चित्रकार नव्हते, तर ते भारतीय संस्कृतीचे संवाहक होते. त्यांच्या कलेतून त्यांनी भारतीय आत्म्याला अभिव्यक्त केले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याची आठवण करून देत त्यांच्या कलेतील मूल्ये जपण्याचा संकल्प करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

'कलेच्या माध्यमातून संस्कृती जपणे आणि समाजाला दिशा देणे' हा संदेश देणारे नंदलाल बोस आजही भारतीय कलेच्या विश्वात अजरामर आहेत.

# हास्यातून समाजवास्तव दाखविणारे 'चार्ली चॅपलिन'

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जन्मदिन विशेष

जगभरातील चित्रपटसृष्टीवर अमिट छाप सोडणारे महान विनोदी अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते चार्ली चॅपलिन यांचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी इंग्लंडमधील लंडन येथे झाला. 'हास्याच्या माध्यमातून समाजाचे वास्तव दाखवणारा कलाकार' म्हणून त्यांची ओळख आजही कायम आहे. त्यांच्या अभिनयात विनोद, भावना आणि सामाजिक संदेश यांचा अद्भुत संगम दिसून येतो.

**सुरूवातीचे जीवन**

चार्ली चॅपलिन यांचे बालपण अत्यंत गरिबीत गेले. त्यांच्या आई-वडिलांचा व्यवसाय रंगभूमीशी संबंधित होता, पण घरची आर्थिक परिस्थिती खूपच हलाखीची होती. लहान वयातच त्यांनी रंगभूमीवर काम करण्यास सुरुवात केली. अनेक संकटांना सामोरे जात त्यांनी आपली कला जोपासली आणि पुढे जाऊन जागतिक कीर्ती मिळविली.

**चित्रपटसृष्टीतील प्रवास**

चार्ली चॅपलिन यांनी मूकपटांच्या युगात आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या 'ट्रॅम्प' या व्यक्तिरेखेला विशेष लोकप्रियता मिळाली. टोपी, काठी आणि वेगळी चाल ही या पात्राची वैशिष्ट्ये होती.

**काही गाजलेले चित्रपट**

द किड (१९२१), सिटी लाइट्स (१९३१), मॉडर्न टाइम्स (१९३६), दि ग्रेट डिक्टेटर (१९४०) या चित्रपटांमधून त्यांनी केवळ मनोरंजन केले नाही, तर समाजातील अन्याय, गरिबी आणि मानवी मूल्ये यांवर भाष्य केले.

**वैशिष्ट्यपूर्ण शैली**

चॅपलिन यांच्या अभिनयाची खासियत म्हणजे संवादांशिवाय भावनांची प्रभावी अभिव्यक्ती. त्यांनी आपल्या हावभाव, देहबोली आणि टायमिंगच्या मदतीने प्रेक्षकांना हसवले आणि विचार करायलाही भाग पाडले. त्यांचा विनोद हा केवळ हास्यासाठी नसून सामाजिक संदेश देणारा होता.


**समाजभान आणि विचार**

'दि ग्रेट डिक्टेटर' या चित्रपटातून त्यांनी हुकूमशाहीविरोधात आवाज उठवला. त्या काळात हा अत्यंत धाडसी प्रयत्न मानला जातो. त्यांच्या कलाकृतींमध्ये मानवी हक्क, समानता आणि स्वातंत्र्य यांचा पुरस्कार दिसतो.

**पुरस्कार आणि सन्मान**

चार्ली चॅपलिन यांना त्यांच्या योगदानासाठी अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. १९७२ मध्ये त्यांना अकादमी पुरस्काराचा मानद पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही जगभरातील कलाकारांवर दिसून येतो. चार्ली चॅपलिन हे केवळ विनोदी अभिनेते नव्हते, तर ते एक महान विचारवंत आणि समाजभान जपणारे कलाकार होते. त्यांच्या कलाकृती आजही तितक्याच प्रभावी वाटतात. त्यांच्या जन्मदिनानिमित्त आपण त्यांच्या कार्याचा सन्मान करताना, त्यांच्या कलेतून मिळणारा सकारात्मक संदेश आपल्या जीवनात आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

'हास्य हेच जीवनातील कठीण प्रसंगांवर मात करण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे' हा संदेश देणारे चार्ली चॅपलिन आजही प्रत्येकाच्या हृदयात जीवंत आहेत.



# जेठालाल ते बबिता... 'तारक मेहता...'च्या कलाकारांनी जमवली इतकी संपत्ती; कोण सर्वांत श्रीमंत?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



'तारक मेहता का उल्टा चष्मा' ही छोट्या पडद्यावरील अत्यंत लोकप्रिय मालिका आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही मालिका प्रेक्षकांचे मनोरंजन करीत आहे. या मालिकेतील प्रत्येक कलाकार घराघरात पोहोचला आहे. जेठालाल, बबिता, दयाबेन, टप्पू या भूमिकांनी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे. या कलाकारांकडे एकूण किती संपत्ती आहे, ते जाणून घेऊया.

'तारक मेहता..' या मालिकेला प्रचंड लोकप्रियता मिळवून देण्यात अभिनेते दिलीप जोशी यांचे मोठे योगदान आहे. यामध्ये जेठालाल गडाची भूमिका साकारून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे. ते या शोमधील सर्वांत श्रीमंत अभिनेते असून त्यांच्याकडे जवळपास ४७ कोटी रुपयांची संपत्ती आहे. अमित भट्ट या मालिकेत चंपकलाल गडा म्हणजेच बापूजींची भूमिका साकारतात. मालिकेच्या सुरुवातीपासून ते काम करत आहेत. आपल्या खऱ्या वयापेक्षा कितीतरी मोठ्या व्यक्तीची भूमिका साकारणारे अमित भट्ट १६.४ कोटी रुपयांच्या संपत्तीचे मालक आहेत.

मालिकेत बबिता आणि जेठालाल यांची केमिस्ट्री सर्वांचे लक्ष वेधून घेते. अभिनेत्री मुनमुन दत्ता यामध्ये बबिताची भूमिका साकारत आहे. या मालिकेतील हा अत्यंत ग्लॅमरस आणि लोकप्रिय चेहरा आहे. मुनमुनची संपत्ती जवळपास ४० कोटी रुपये इतकी आहे.

माधवी भिडेची भूमिका अभिनेत्री सोनालिका जोशी साकारत आहे. या मराठमोळ्या अभिनेत्रीने हिंदी मालिकेत आपली विशेष छाप सोडली आहे. सोनालिका आणि भिडे मास्तर ही जोडी चाहत्यांमध्ये विशेष लोकप्रिय आहे. सोनालिकाकडे जवळपास दहा कोटी रुपयांची संपत्ती असल्याचे कळते.

गोकुळधाम सोसायटीचे एकमेव सेक्रेटरी आत्माराम भिडेची भूमिका अभिनेते मंदार चांदवडकर साकारत आहेत. मंदारसुद्धा या मालिकेच्या सुरुवातीपासून ही भूमिका साकारत आहेत. या भूमिकेमुळे त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली. त्यांची एकूण संपत्ती ४२ कोटींच्या आसपास आहे.

मालिकेत बबिताचा पती कृष्णन अय्यरची भूमिका अभिनेता तनुज महाशब्दे साकारत आहे. जेठालाल आणि अय्यर यांच्यातील थट्टामस्करी प्रेक्षकांना खूपच आवडते. तनुजकडे जवळपास ३० कोटी रुपयांची संपत्ती आहे.

# मानवी आवाजाचे महत्त्व, काळजी आणि आरोग्याबाबत जागरूकता

जागतिक आवाज दिन विशेष

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



जागतिक आरोग्य जनजागृती उपक्रमांमध्ये महत्त्वाचे स्थान असलेला जागतिक आवाज दिन दरवर्षी १६ एप्रिल रोजी साजरा केला जातो. मानवी आवाजाचे महत्त्व, त्याची काळजी आणि आरोग्य याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

**आवाजाचे महत्त्व**

मानवी आवाज हा संवादाचे प्रभावी साधन आहे. आपल्या भावना, विचार आणि कल्पना व्यक्त करण्यासाठी आवाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. शिक्षक, गायक, अभिनेते, वक्ते आणि कॉल सेंटरमध्ये काम करणारे कर्मचारी यांच्यासाठी तर आवाज हेच त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन आहे.

**आवाज कसा तयार होतो?**

आवाज हा आपल्या स्वरयंत्रातून निर्माण होतो. श्वास घेताना हवा फुफ्फुसातून वर येते आणि स्वरयंत्रातील तंतूंना कंप देते, त्यामुळे आवाज निर्माण होतो. योग्य पद्धतीने आवाजाचा वापर केला नाही, तर स्वरयंत्रावर ताण येऊन विविध समस्या निर्माण होऊ शकतात.

**आवाजाशी संबंधित समस्या**

अयोग्य वापर, अतिताण, धूम्रपान, प्रदूषण किंवा संसर्ग यामुळे आवाजात बदल होऊ शकतो. काही सामान्य समस्या- आवाज बसणे, घसा दुखणे, स्वरयंत्रावर गाठी येणे, आवाजात कमकुवतपणा या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास गंभीर आजार होऊ शकतात.

**आवाजाची काळजी कशी घ्यावी?**

जागतिक आवाज दिनानिमित्त तज्ज्ञांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या सूचना- पुरेसे पाणी प्या, जोरात ओरडणे टाळा, धूम्रपान व मद्यपान टाळा, दीर्घकाळ बोलताना विश्रांती घ्या, योग्य आहार आणि जीवनशैली पाळा, समस्या जाणवल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**व्यावसायिकांसाठी विशेष काळजी**

गायक, शिक्षक, वक्ते यांसारख्या व्यावसायिकांनी आवाजाचा योग्य सराव करणे आवश्यक आहे. आवाज गरम (warm-up) करणे, श्वसनाचे व्यायाम करणे आणि ताण कमी ठेवणे यामुळे आवाज निरोगी राहतो.

**समाजातील जनजागृती**


जागतिक आवाज दिनानिमित्त विविध कार्यक्रम, कार्यशाळा आणि मोहिमा आयोजित केल्या जातात. यामधून लोकांना आवाजाचे महत्त्व समजावून सांगितले जाते आणि त्याच्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन केले जाते. मानवी जीवनात आवाजाचे स्थान अनन्यसाधारण आहे. संवाद, अभिव्यक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे त्याची योग्य काळजी घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

'आपला आवाज जपा, कारण तोच तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा आहे.'

# शिस्तबद्ध कार्यपद्धतीसह लोकाभिमुख दृष्टिकोन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जन्मदिन विशेष



भारतीय राजकारणात स्वच्छ प्रतिमा, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि लोकाभिमुख दृष्टिकोन यासाठी ओळखले जाणारे राम नाईक हे एक ज्येष्ठ आणि आदरणीय नेते आहेत. त्यांचा जन्म १६ एप्रिल १९३४ रोजी महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात झाला. त्यांच्या कार्याचा ठसा महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रावर उमटलेला आहे.

**प्रारंभिक जीवन आणि शिक्षण**

राम नाईक यांचे बालपण साधेपणाने गेले. त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले आणि पुढे सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. विद्यार्थी दशेतच त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित झाले होते. त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि सामाजिक संस्थांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

**राजकीय प्रवास**

राम नाईक यांनी भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला. त्यांनी अनेक वर्षे मुंबईतून लोकसभा सदस्य म्हणून प्रतिनिधित्व केले. त्यांच्या कामाची पारदर्शकता आणि जनतेशी असलेले घट्ट नाते यामुळे ते लोकप्रिय ठरले. ते केंद्र सरकारमध्ये पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री म्हणूनही कार्यरत होते. या काळात त्यांनी इंधन वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या कार्यकाळात ग्राहकांच्या हितासाठी अनेक सुधारणा राबवण्यात आल्या.

**राज्यपाल म्हणून योगदान**

राम नाईक यांनी उत्तर प्रदेशचे राज्यपाल म्हणूनही उल्लेखनीय कार्य केले. त्यांनी राज्यातील प्रशासन अधिक जबाबदार आणि लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेसाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले.

**सामाजिक कार्य आणि विचार**

राम नाईक हे केवळ राजकारणी नसून समाजसेवकही आहेत. त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा आणि नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या कार्यातून युवकांना प्रेरणा मिळते. ते नेहमीच लोकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यावर भर देत आले आहेत.

**पुरस्कार आणि सन्मान**

त्यांच्या दीर्घ आणि उल्लेखनीय सेवेसाठी त्यांना विविध सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. सार्वजनिक जीवनातील त्यांचे योगदान आजही आदर्श मानले जाते. राम नाईक यांचे आयुष्य हे प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि जनसेवेचे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करताना, समाजहितासाठी काम करण्याची प्रेरणा घेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

'सार्वजनिक जीवनात पारदर्शकता आणि प्रामाणिकता हीच खरी ताकद आहे' हा संदेश देणारे राम नाईक आजही समाजासाठी प्रेरणास्थान आहेत.

# संसार सांभाळतानाच स्पर्धा परीक्षेत यश

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सक्सेस स्टोरी





बेनिक्रे (ता. कागल) येथील सुरैया साहेबलाल देसाई यांनी संसाराची जबाबदारी सांभाळत, अडचणींवर मात करत विक्रीकर सहाय्यक पद पटकावले. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत झालेल्या परीक्षेत आर्थिक दुर्बल घटक महिलांमधून राज्यात प्रथम क्रमांक मिळवत त्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. अपयश अनेक वेळा आले परंतु प्रत्येक अपयशाने त्यांची जिद्द अधिक बळकट होत गेली.

उच्च शिक्षणासाठी त्यांनी बी.टेक. पर्यंतचा प्रवास पूर्ण केला. त्यानंतर कारदगा (जि. बेळगाव) येथील नयीम पटेल यांच्याशी विवाह झाला. पती खासगी नोकरी करत असताना संसाराची जबाबदारी सांभाळत त्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरूच ठेवला. घर, संसार आणि अभ्यास यांचा समतोल साधणे आव्हान होते; पण त्यांनी चिकाटी सोडली नाही.

दरम्यान, त्यांना मुलगा झाला. मुलाच्या वारंवार होणाऱ्या आजारपणामुळे अभ्यासात खंड पडत होता. या काळात लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत थोडक्यात संधी गेली. अशा वेळी त्यांच्या आईने त्यांना मोलाची साथ दिली. त्या लहानग्याला आईकडे ठेवून पुन्हा नव्या उमेदीने अभ्यासाला लागल्या. सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर गतवर्षी झालेल्या परीक्षेत त्यांनी विक्रीकर सहाय्यक पद मिळवले आणि आर्थिक दुर्बल घटक महिलांमधून राज्यात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली.

सुरैया देसाई यांच्या या यशामुळे बेनिक्रे येथे त्यांच्या मूळ गावी अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आई वडील यांच्यासह आजी, मामा, पती आणि त्यांचे कुटुंबीय यांची मोलाची साथ त्यांना लाभली.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे






# शनीच्या साडेसातीचा होणार त्रास दूर

## अक्षय्य तृतीयेला न चुकता करा ‘हे’ उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला मुहूर्त म्हणजे अक्षय्य तृतीया. या दिवशी केलेले काही खास आणि सोपे उपाय साडेसातीपासून त्रस्त असलेल्या लोकांना काही काळ आराम देऊ शकते. कोणते आहेत हे उपाय जाणून घेऊ.

हिंदू धर्मात अक्षय्य तृतीया हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक पूर्ण मुहूर्त मानला जातो. या दिवशी केलेली दानधर्म आणि पूजा-अर्चा अक्षय फळ देणारी असते. मात्र, ज्या जातकांच्या राशीवर सध्या शनीची साडेसाती किंवा धैया सुरू आहे त्यांच्यासाठी हा दिवस शनीची पीडा कमी करण्याची एक सुवर्णसंधी घेऊन आला आहे.

यंदा १९ एप्रिल २०२६ ला अक्षय्य तृतीया साजरी केली जाणार आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला आणि अत्यंत शुभ मानला जाणारा हा मुहूर्त अनेक कार्यांसाठी आणि नवीन कामांसाठी शुभ मानला जातो. पण याच दिवशी केलेले काही सोपे उपाय शनीच्या साडेसातीतून काही काळासाठी का होईना आराम देऊ शकते.

ज्या राशींवर शनीची साडेसाती सुरू आहे त्या जातकांनी अक्षय्य तृतीयेच्या दिवशी शनी देवाचे विशेष पूजन करावे. सकाळी स्नान उरकून शनी मंदिरात जाऊन दर्शन घ्यावे. या दिवशी शनी देवाला निळी फुले अर्पण केल्याने मानसिक शांती लाभते आणि शनीची वक्रदृष्टी सौम्य होते, असे मानले जाते.

शनी देवाला काळे तीळ अत्यंत प्रिय आहेत. अक्षय्य तृतीयेला काळ्या तिळाचे दान केल्याने शनी दोषाची तीव्रता कमी होते. या दिवशी मूठभर काळे तीळ वाहत्या पाण्यात विसर्जित करणे किंवा शनी मंदिरात अर्पण करणे अत्यंत फलदायी मानले जाते. यामुळे आरोग्याच्या तक्रारी दूर होण्यास मदत होते.

साडेसातीचा प्रभाव कमी करण्यासाठी अक्षय्य तृतीयेला शनी मंदिरात लोखंडी किंवा स्टीलचा दिवा दान करावा. त्या दिव्यामध्ये तिळाचे तेल, थोडे काळे तीळ आणि वात घालून तो प्रज्वलित करावा. यामुळे शनी देव प्रसन्न होतात आणि आयुष्यातील अंधार दूर होऊन प्रगतीचे मार्ग मोकळे होतात.

जर तुम्हाला शनी मंदिरात जाणे शक्य नसेल, तर घरीच शनीच्या प्रतिमेसमोर बसून ‘ओम शं शनैश्चराय नमः’ या मंत्राचा ११ ते २१ वेळा जप करावा. मंत्रजपानंतर एक दिवा घराच्या मुख्य दरवाजाबाहेर लावावा. यामुळे घरातील नकारात्मक ऊर्जा नष्ट होऊन साडेसातीचा त्रास कमी होतो.

अन्नदान हे सर्वात श्रेष्ठ दान मानले जाते. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी गरिबांना किंवा गरजू व्यक्तींना अन्न किंवा मिठाई दान करावी. हे दान देताना ते शक्यतो काळ्या रंगाच्या डब्यात ठेवून द्यावे. या उपायामुळे शनी देव आपल्या कर्मावर प्रसन्न होतात आणि आर्थिक अडचणींमधून सुटका होते. तसेच या दिवशी गरजू लोकांना काळ्या वस्त्रांचे किंवा चप्पल किंवा छत्रीचे दान करावे.

# श्री गुरुदेव दत्तात्रयांचे सोळा अवतार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

### १) योगिराज

ब्रह्मदेवांचे मानसपुत्र ‘अत्री’ हे पुत्रप्राप्तीसाठी पत्नीसह हिमालयात कठोर तपश्चर्या करीत होते. त्यांच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन साक्षात भगवान कार्तिक शुद्ध १५ ला प्रकट झाले. त्यांचे रूप स्फटिकासारखे ज्योतिर्मय होते. दत्तात्रयांचा हा अवतार ‘योगिराज’ म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांनी योगमार्गाचा पुरस्कार करून लोकांना सुखी केले. म्हणून वरील नाव पडले. हा अवतार एकमुखी चतुर्भुज व प्रत्यक्ष भगवान विष्णूप्रमाणेच होता.

### २) अत्रिवरद

अत्री ऋषींनी ऋक्ष पर्वतावरील पर्वतावरील परमतीर्थावर १०० वर्षे तप केले. तेव्हा त्यांना वर देण्याकरिता ‘अत्रिवरद’ या नावाने हे योगिराज अवतरले. ब्रह्मा, विष्णू व महेश हे तिन्ही देव या तपाच्या वेळी अत्रींपुढे प्रकट झाले. आपण एकाचेच ध्यान करतो आहोत. मग हे तिघे जण कसे प्रकट झाले याचे आश्चर्य अत्रींना वाटले. तेव्हा ते म्हणाले, की ‘तू ज्या एकाचे ध्यान करीत आहेस, तोच आम्हा तिघांत आहे.’ या अत्रिवरदाचे रूप तप्त सुवर्णकांन्तीप्रमाणे तेजस्वी, हसतमुख व षड्भुज होते. (जन्म : कार्तिक कृष्ण प्रतिपदा)

### ३) दत्तात्रय

अत्रिवरदाने अत्री ऋषींना वर मागण्यास सांगितले. तेव्हा तुमच्यासारखाच पुत्र असावा, असा वर अत्रींनी मागितला. त्यावर ‘तथास्तु’ म्हणून बालरूपातील आपले स्वरूप त्यांनी प्रकट केले. ते दिगंबर रूप मदनासारखे सुंदर व नीलमण्यासारखे तेजस्वी होते. मुख चंद्राप्रमाणे व हात चार होते. हाच दत्तात्रयांचा ‘दत्तात्रय’ नामक तिसरा अवतार. (जन्म : कार्तिक कृष्ण २)

### ४) कालाग्निशमन

यानंतर आपणास औरस पुत्र असावा म्हणून अत्री ऋषी पुन्हा तप करू लागले. या उग्र तपाने त्यांच्या शरीरात कालाग्नी प्रकट झाला व त्याचा दाह होऊ लागला. तेव्हा याचे शमन करण्यासाठी भगवान शीतल रूप घेऊन प्रकट झाले. म्हणूनच यास ‘कालाग्निशमन’ हे नाव पडले. (जन्म : मार्गशीर्ष शुद्ध १५)

### ५) योगीजनवल्लभ

या कालाग्निशमनाच्या दर्शनास देव, ऋषी, गंधर्व, यक्ष व किन्नर जमा झाले. तेव्हा दत्तात्रयांनी आपल्या बालरूपाचा त्याग करून योगीजनांना प्रिय असे रूप धारण केले. हे अवतार ‘योगिजनवल्लभ’ या नावाने प्रसिद्ध आहे. (जन्म : मार्गशीर्ष शुद्ध १५)

### ६) लीलाविश्वंभर

दत्तात्रयांचा सहावा अवतार ‘लीलाविश्वंभर’ ज्यावेळी लोक अवर्षणामुळे अन्नान्न दशेस लागले होते तेव्हा दत्तात्रयांनी लोकांचे कल्याण करण्यासाठी हा अवतार घेतला. (जन्म : पौष शुद्ध १५)



### ७) सिद्धराज

भ्रमंतीत एकदा दत्तात्रय बद्रिकावनात गेले. तेथे त्यांना अनेक सिद्ध दिसले. दत्तात्रयांनी कुमार रूप धारण केले आणि अनेक चमत्कार करून सिद्धांचे गर्वहरण केले व त्या सर्वांना योगदीक्षा दिली. हा दत्तात्रयांचा ‘सिद्धराज’ नावाचा सातवा अवतार. (जन्म : माघ शुद्ध १५)

### ८) ज्ञानसागर

सिद्धीला कामनेची जोड नसावी हे पटवण्यासाठी दत्तात्रय यांनी रूपातीत, गुणातीत, ज्ञानयोगमुक्त असे सहजस्थितीतील ‘ज्ञानसागर’ नावाचे रूप धारण केले. (जन्म : फाल्गुन शुद्ध १०)

### ९) विश्वंभरावधूत

पुढे आणखी एकदा सिद्धांना बोध देण्यासाठी दत्तात्रय यांनी ‘विश्वंभरावधूत’ या नावाचा नववा अवतार घेतला व योगीजनांना बीजाक्षर मंत्रांचा (द्रां) उपदेश केला. (जन्म : चैत्र शुद्ध १५)

### १०) मायामुक्तावधूत

भक्तांच्या अंतःकरणातील प्रेम व श्रद्धा दृढ करण्यासाठी दत्तात्रय यांनी ‘मायामुक्तावधूत’ या नावाचा दहावा अवतार घेतला. (जन्म : वैशाख शुद्ध १४)

### ११) मायायुक्तावधूत

दत्तात्रयांच्या अकराव्या अवताराचे नाव ‘मायायुक्तावधूत’ असे असून याचे रूप सावळे व सुंदर होते. मांडीवर एक सुंदर स्त्री घेऊन मद्य व मांस यांचे भक्षण सुरू होते. ही योगमाया होती. (जन्म : ज्येष्ठ शुद्ध १३)

### १२) आदिगुरू

दत्तात्रयांचा बारावा अवतार आदिगुरू या नावाने प्रसिद्ध आहे. मदालसेचा पुत्र ‘अलर्क’ यास योगाचा व तत्त्वज्ञानाचा उपदेश करण्यासाठी दत्तात्रयांनी हा अवतार धारण केला. (जन्म : आषाढ शुद्ध १५)

### १३) शिवरूप

एकदा काळ्या आवळीच्या वृक्षाखाली दत्तात्रेय प्रगट झाले. हा दत्तात्रयांचा ‘शिवरूप’ नावाचा तेरावा अवतार. (जन्म : श्रावण शुद्ध ८)

### १४) देवदेवेश्वर

दत्तात्रय यांचा ‘देवदेवेश्वर’ नावाचा चौदावा अवतार आहे. (जन्म : भाद्रपद शुद्ध १४)

### १५) दिगंबर

दत्तात्रय यांचा हा पंधरावा अवतार ‘दिगंबर’ या नावाने प्रसिद्ध असून, यदुराजास श्री दत्त दिगंबर भेटले व त्यांनी आपल्या २४ गुरूंपासून काय, काय ज्ञान घेतले याचा त्याला बोध केला. (जन्म : आश्विन शुद्ध १५)

### १६) कमललोचन

‘कमललोचन’ नावाने सोळाव्या अवतारात दत्तात्रय प्रकट झाले....(जन्म : कार्तिक शुद्ध १५)

ॐ योगिराजाय नमः ।
ॐ अत्रिवरदाय नमः ।
ॐ दत्तात्रेयाय नमः ।
ॐ कालाग्निशमनाय नमः ।
ॐ योगिजन वल्लभाय नमः ।
ॐ लीलाविश्वंभराय नमः ।
ॐ सिद्धराजाय नमः।
ॐ ज्ञानसागराय नमः ।
ॐ विश्वंभरावधूताय नमः ।
ॐ मायामुक्तावधूताय नमः ।
ॐ मायायुक्तावधूताय नमः ।
ॐ आदिगुरूः नमः ।
ॐ शिवरूपाय नमः ।
ॐ देवदेवेश्वराय नमः ।
ॐ दिगंबरावधूताय नमः ।
ॐ कमललोचनाय नमः ।

वास्तविक दत्तात्रयांचे कार्यपरत्वे प्रत्येक वेळी होणारा अविष्कार हा अवतारच मानला जातो. या दृष्टीने स्वयंभू मन्वतरापासून तो आतापर्यंत भक्तजनांच्या कल्याणाकरिता दत्तात्रयांचे जे विविध अवतार झाले त्यात १६ अवतारांना प्राधान्य देण्यात येते.

दत्तात्रयांचे हे अवतार निरनिराळ्या महिन्यांत व निरनिराळ्या मुहूर्तावर झालेले असून त्यांची स्वरूपेही भिन्न-भिन्न अशी वर्णिलेली आहेत.

**। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।**

# शिवकालापासून पेशवाईपर्यंतचे साक्षीदार

## काळभैरवनाथ मंदिराला ऐतिहासिक वारसा; अशी आहे आख्यायिका



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पुण्यामध्ये अनेक ऐतिहासिक स्थळे असून आजही त्या ठिकाणी इतिहासाच्या पाऊलखुणा पाहावयास मिळतात. आळंदीपासून अवघ्या ३ ते ४ किलोमीटर अंतरावर असलेले चऱ्होळी बुद्रुक हे गाव छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून ते पेशव्यांच्या काळापर्यंत अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे. या गावात असलेले काळभैरवनाथ देवाचे मंदिर प्राचीन असून या मंदिराला विशेष धार्मिक महत्त्व आहे. अनेक सरदार आणि मावळे युद्धासाठी निघण्यापूर्वी या मंदिरात दर्शन घेऊन लढाईला जात होते. भाविकांमध्ये अशी श्रद्धा आहे, की सर्पदंश झाल्यास काळभैरवनाथाचे दर्शन घेतल्यावर बाधा कमी होते आणि व्यक्ती बरी होते.

हे मंदिर अतिशय प्राचीन असून पूर्णपणे दगडात कोरलेले आहे. विशेष म्हणजे शत्रूपासून बचावासाठी मंदिराची रचना वेगळ्या पद्धतीने करण्यात आली आहे. मोहमदन पद्धतीने हे मंदिर बांधण्यात आले असल्याचे सांगण्यात येते. बाहेरून पाहिले असता हे मंदिर इतर मंदिरांपेक्षा वेगळे दिसते. शत्रूपासून संरक्षणासाठी हा एक प्रकारचा गनिमी कावा असल्याचेही सांगितले जाते. अनेक ठिकाणांहून भाविक या मंदिरात दर्शनासाठी येत असतात.

**काळभैरवनाथ मंदिराला ऐतिहासिक वारसा**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून ते पानिपतच्या युद्धापर्यंत तापकीर घराण्यातील अनेक सरदार आणि मावळे युद्धावर जाण्यापूर्वी या काळभैरवनाथ मंदिरात दर्शनासाठी येत असत. लढाईसाठी निघण्यापूर्वी प्रत्येक सरदार मंदिरात येऊन देवाचे दर्शन घेऊन साकडे घालत असे. या मंदिरात दर्शन घेतल्यानंतर सरदार मंडळींना लढाईत अनेकवेळा यश मिळत असे, असेही सांगितले जाते.


# जगातील सर्वांत मोठ्या हिंदू मंदिरात दडलेली आहेत गूढ रहस्य


## भारतात नाही मग कुठे आहे ‘हे’ मंदिर?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्म हा जगातील सर्वांत जुना आणि प्राचीन आहे धर्म मानला जातो. हिंदू धर्माचा इतिहास सर्वांत जुना आहे. हा धर्म वैदिक काळापूर्वीचा मानला जातो. कारण वैदिक काळ आणि वेदांच्या रचनेचा कालखंड हा भिन्न मानला जातो. भारतातील सुमारे ८० टक्के लोक हिंदू धर्मावर विश्वास ठेवतात आणि याच कारणामुळे भारतात अनेक हिंदू मंदिरे आहेत.

देशात असे कोणतेच गाव किंवा शहर सापडणार नाही जेथे मंदिर नसेल. पण असे असूनही जगातील सर्वांत मोठे हिंदू मंदिर भारतात नाही तर कंबोडियामध्ये आहे. या मंदिराचे नाव अंगकोरवट मंदिर आहे. हे मंदिर अंगकोर, कंबोडिया येथे आहे. ज्याचे जुने नाव ‘यशोधरपूर’ होते. हे १२ व्या शतकात खमेर राजवंशातील सम्राट सूर्यवर्मन दोनच्या कारकिर्दीत बांधले गेले होते. पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी बहुतेक शिवमंदिरेच बांधली होती पण हे एक विष्णू मंदिर आहे.





अंगकोरवट हे जगातील अशा मोजक्या मंदिरांपैकी एक आहे ज्याचे मुख्य प्रवेशद्वार पश्चिमेकडे आहे. साधारणपणे हिंदू मंदिरे पूर्वेकडे तोंड करून असतात. विशेष म्हणजे वर्षातून दोनदा ‘इक्विनॉक्स’ दिवशी सूर्य बरोबर मंदिराच्या मध्यवर्ती शिखराच्या मागून उगवताना दिसतो, जे त्या काळातील खगोलशास्त्रीय ज्ञानाचा पुरावा आहे.

हे मंदिर १२ व्या शतकाच्या सुरुवातीला राजा सूर्यवर्मन द्वितीय याने भगवान विष्णूला समर्पित म्हणून बांधले होते. मात्र, १३ व्या शतकाच्या शेवटी हे मंदिर हळूहळू बौद्ध मंदिरामध्ये रूपांतरित झाले. आजही येथे हिंदू आणि बौद्ध अशा दोन्ही परंपरांचा संगम पाहावयास मिळतो. मंदिराच्या रचनेत पाच उंच शिखरे आहेत, जी हिंदू पौराणिक कथेतील देवतांचे निवासस्थान असलेल्या ‘मेरू’ पर्वताचे प्रतीक मानली जातात. मंदिराभोवती असलेली अथांग पाण्याची दरी ही मेरू पर्वताभोवती असलेल्या क्षीरसागराचे प्रतीक आहे.

मंदिराच्या भिंतींवर रामायण, महाभारत आणि पुराणांमधील अनेक प्रसंग कोरलेले आहेत. यात देव आणि दानवांनी वासुकी नागाच्या साहाय्याने केलेले ‘समुद्रमंथन’ हे जगातील सर्वात मोठे आणि बारकाईने केलेले कोरीव काम मानले जाते. येथील अप्सरांच्या १५०० पेक्षा जास्त मूर्ती प्रत्येकी वेगळ्या केशरचनेत आहेत.

हे भव्य मंदिर केवळ ३५-४० वर्षांत पूर्ण झाले होते. यासाठी वापरलेले ५ दशलक्ष टनापेक्षा जास्त वाळूचे दगड ५० किलोमीटर दूर असलेल्या डोंगरावरून आणले गेले होते. शास्त्रज्ञांच्या मते, हे दगड कालव्यांच्या सहाय्याने वाहून आणले असावेत. परंतु इतके दगड इतक्या अचूकपणे कसे जोडले गेले, हे आजही एक रहस्य आहे.

हे मंदिर कंबोडियासाठी इतके महत्त्वाचे आहे, की त्यांच्या राष्ट्रीय ध्वजावर या मंदिराचे चित्र आहे. जगातील कोणत्याही देशाच्या ध्वजावर अशा प्रकारे एका हिंदू मंदिराची प्रतिकृती असणे ही एकमेव घटना आहे. १९९२ मध्ये ‘युनेस्को’ने याला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे.

# बद्रीनाथ धाम मंदिरात शंख वाजवण्यास सक्त मनाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



उत्तराखंडमधील चार धामांपैकी एक असलेल्या बद्रीनाथ धाम मंदिरात भगवान विष्णू यांची पूजा केली जाते. हिंदू धर्मात शंख फुंकणे अत्यंत शुभ मानले जाते आणि शंखाचा ध्वनी देवांना प्रिय असतो, असे म्हटले जाते. मात्र, आश्चर्याची गोष्ट म्हणजे बद्रीनाथ मंदिरात शंख वाजवण्यास सक्त मनाई आहे.

शंख हा भगवान विष्णूंच्या आवडत्या वस्तूंपैकी एक आहे, पण तुम्हाला माहिती आहे का की बद्रीनाथ धाममध्ये शंख वाजवला जात नाही. येथे पूजेदरम्यान शंख वाजवला जात नाही. काही लोक यामागील गूढतेबद्दल बोलतात तर काही लोक त्यामागील वैज्ञानिक कारणे सांगतात. येथे शंख का वाजवला जात नाही हे आपणास माहिती आहे का?

बद्रीनाथ धामच्या आजूबाजूचा परिसर हा अलकनंदा नदीच्या काठावर वसलेला आहे. हा परिसर भगवान नारायणाच्या तपश्चर्येचे ठिकाण मानले जाते. दुसऱ्या एका आख्यायिकेनुसार बद्रीनाथ धामजवळ साप राहतात, असे मानले जाते.

शंखाचा आवाज सापांसाठी वेदनादायक मानला जातो. असे मानले जाते, की शंख वाजवल्याने सापांना राग येऊ शकतो ज्यामुळे नैसर्गिक आपत्ती किंवा त्या परिसरात अडथळे येऊ शकतात. या कारणास्तव येथे शंख वाजवण्यास मनाई आहे.

बद्रीनाथ मंदिर हे हिमालयाच्या अत्यंत उंचावर आणि बर्फाच्छादित डोंगररांगांमध्ये थित आहे. वैज्ञानिकांच्या मते, शंख वाजवल्याने निर्माण होणाऱ्या ध्वनी लहरींची वारंवारता खूप जास्त असते. जर हा नाद तेथे केला, तर डोंगरांवरील बर्फामध्ये कंपने निर्माण होऊन ‘हिमस्खलन’ होण्याचा किंवा बर्फात भेगा पडण्याचा मोठा धोका असतो.

बद्रीनाथमध्ये शंख न वाजवण्याची एक कथा शास्त्रांमध्ये आढळते. एकदा देवी लक्ष्मीजी बद्रीनाथच्या तुलसी भवनात ध्यान करत होत्या. त्यावेळी भगवान विष्णूंनी शंखचूर्ण नावाच्या राक्षसाचा वध केला. हिंदू धर्मात विजय झाल्यावर शंख वाजवला जातो परंतु विष्णूजींना लक्ष्मीजींच्या ध्यानात अडथळा आणायचा नव्हता म्हणून त्यांनी शंख वाजवला नाही.

ही परंपरा अनेक शतकांपासून चालत आली आहे. मंदिरातील पुजारी आणि स्थानिक लोक या नियमाचे काटेकोरपणे पालन करतात. वैज्ञानिक दृष्टिकोन असो वा धार्मिक श्रद्धा, बद्रीनाथ धामच्या शांततेतच या स्थानाचे पावित्र्य जपले जाते.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**